प्रबोधन
गोरेगाव

# सतरावा वार्षिक अहवाल

## १९८९ - ९०

# प्रबोधन गोरेगाव

## १७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची १७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १९ जानेवारी १९९१ रोजी रात्रौ ९ वाजता, विद्युत, ३रा मजला, लोकमान्य टिळक नगर, रस्ता क्र. ४, म. गांधी मार्ग, गोरेगाव (प.), मुंबई–६२ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१. प्रास्ताविक
२. १९८९-९० चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे.
३. नवीन वर्षाकरिता (१९९०-९१) घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ६ जागा)
४. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.
५. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन
**गिरीश देसाई**
कार्याध्यक्ष

**डॉ. मनोहर अद्वानकर**
प्रमुख कार्यवाह

दि. ३०-१२-९०
गोरेगाव, मुंबई–६२

---

१) संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ ३ प्रेमबिंदु, स्वा. वि. मार्ग, बालिगा नार्सिंगहोमच्या मागे, गोरेगाव (प) येथील संस्थेच्या कार्यालयात दि. १४-१-९१ व १५-१-९१ पर्यंत रोज रात्रौ ६ ते ७ पर्यंत ठेवण्यात येईल.

२) कोणाही सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक १८-१-९१ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

४) निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. १५-१-९१ पूर्वी संस्था कार्यालयात संध्या ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमूना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# प्रबोधन, गोरेगाव

## १७ वा वार्षिक अहवाल

## १९८९ – १९९०

'प्रबोधन–गोरेगाव' या संस्थेच्या कार्याचा दि. १ एप्रिल १९८९ ते ३१ मार्च १९९० या कालावधीचा अहवाल व हिशोब पत्रके संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करताना कार्यकारी मंडळास आनंद होत आहे.

### कार्यकारी मंडळ आणि सभा :

या अहवाल वर्षात संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या एकूण १० सभा घेण्यात आल्या. या सभांना कार्यकारी मंडळाच्या सभासदांची सरासरी उपस्थिती संख्या १२ होती. या अहवाल वर्षात कार्यकारी मंडळाची एकूण सभासद संख्या स्वीकृत सभासदांसह १९ होती.

### वर्धापन दिन सोहळा :

यंदाच्या अहवाल वर्षाचा शुभारंभ सतराव्या वर्धापन दिन सोहळ्याने झाला. दिनांक ५ एप्रिल १९८९ रोजी गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी हा वर्धापन दिन सोहळा दीनानाथ नाट्यगृह, विलेपार्ले येथे उत्साही व कौटुंबिक वातावरणात पार पडला. त्या प्रसंगी गोरेगावातील मराठी माध्यमाच्या शाळांतील विविध विषयांत सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा, त्याचप्रमाणे सर्व शाळांतून सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांचा रोख पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. या समारंभाचे अध्यक्षस्थान श्री. नंदकुमार काळे, शिवसेना विभाग प्रमुख, विभाग क्र. ५ यांनी भूषविले होते. ह्याप्रसंगी संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना 'पांडगो इलो रे बा इलो' या सदाबहार मालवणी ढंगातील नाटकाचा प्रयोग दाखविण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे सभासद सहकुटुंब उपस्थित असल्याने, या वर्धापन दिन सोहळ्यास खरेखुरे कौटुंबिक स्वरुप प्राप्त झाले होते.

### प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा : वर्ष १७ वे :

सालाबादप्रमाणे या वर्षाच्या वक्तृत्व स्पर्धा रविवार दि. २४ सप्टेंबर १९८९ रोजी पाटकर महाविद्यालय, गोरेगाव येथे उत्साही वातावरणात पार पडल्या. अखिल महाराष्ट्र पातळीवर घेण्यात येणाऱ्या शालेय व महाविद्यालयीन गटाच्या या स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यंदाच्या वर्षीच्या स्पर्धा या कथाकथनाच्या स्पर्धा होत्या.

पालक, शिक्षक, विद्यार्थी व इतर हितचिंतकांच्या उपस्थितीत अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेचा बक्षिस समारंभ त्याचदिवशी श्री. प्रभाकरपंत मोडक यांच्या शुभहस्ते पार पडला. विजेत्या स्पर्धकांना रोख बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात आली तर विजेत्या संघांना आकर्षक फिरता चषक देण्यात आला. या स्पर्धेच्या शालेय गटाचे परीक्षण श्री. किरण वाढीवकर व सौ. सुधा मधुसुदन यांनी तर महाविद्यालयीन गटाचे परीक्षण श्री. चंद्रशेखर टिळक व सौ. वैशाली वैद्य यांनी केले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

**शालेय गट :**

शिक्षण महर्षी कै. दादासाहेब रेगे स्मृति प्रबोधन फिरता चषक :

सांघिक विजेता संघ : नंदादीप विद्यालय, गोरेगाव (पूर्व)

स्पर्धक विद्यार्थी : सलील पानसे व सत्यजित वैद्य

### कथाकथन स्पर्धा :

प्रथम पारितोषिक : (रोख रु. १५०/–)

सलील पानसे, नंदादीप विद्यालय, गोरेगाव (पूर्व)

द्वितीय पारितोषिक : (रोख रु. १००/–) विभागून

अस्मिता प्रधान, सरस्वती सेकंडरी स्कूल, ठाणे

व

निळकंठ शिंदे, अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल

तृतीय पारितोषिक : (रोख रु. ५०/–)

नयना देसाई, न्यू इंग्लिश स्कूल, वांद्रे

## उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :

प्रथम पारितोषिक : (रोख रु. १००/–)
ॐकार पत्की, टिळकनगर विद्यामंदिर, डोंबिवली
द्वितीय पारितोषिक : (रोख रु. ५०/–)
मंजिरी नातू, वामनराव मुरांजन माध्यमिक विद्यालय, मुलुंड.

## महाविद्यालयीन गट :

**कै. जगदिश गोविंदराव कुलकर्णी स्मृति – प्रबोधन फिरता चषक :**
सांघिक विजेते महाविद्यालय : म.ल. डहाणूकर वाणिज्य महाविद्यालय, विलेपार्ले

स्पर्धक विद्यार्थी : भालचंद्र फडके व प्रसाद देसाई

## कथाकथन स्पर्धा :

प्रथम पारितोषिक : (रोख रु. २००/–)
भालचंद्र फडके, डहाणूकर महाविद्यालय, विलेपार्ले
द्वितीय पारितोषिक : (रोख रु. १५०/–)
संपदा जोगळेकर, जोशी कला आणि बेडेकर, वाणिज्य महाविद्यालय, ठाणे
तृतीय पारितोषिक : (रोख रु. १००/–)
परेश मोकाशी, मॉर्डन कॉलेज, पुणे

## उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :

प्रथम पारितोषिक : (रोख रु. १५०/–)
प्रशांत जोशी, पोद्दार महाविद्यालय, माटुंगा
द्वितीय पारितोषिक : (रोख रु. १००/–)
प्रसाद देसाई, डहाणूकर महाविद्यालय, विलेपार्ले

## प्रबोधन क्रीडा संकुल :

'प्रबोधन'ने आपल्या स्थापनेपासूनच गोरेगाव या उपनगरात सांस्कृतिक कार्याचा ठसा उमटविला. गोरेगावातील शालेय त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या व पर्यायाने नागरीकांच्या सांस्कृतिक जडणघडणीत प्रबोधनचा वाटा फार महत्त्वाचा आहे, हे याठिकाणी नमूद केले पाहिजे. संस्थेची स्थापना अठरा वर्षापूर्वी झाली असली, तरी बारा वर्षापूर्वी संस्थेने क्रीडाक्षेत्रांत प्रवेश केला व वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी, दरवर्षी क्रीडामहोत्सवाचे आयोजन करुन, क्रीडाविश्वात मानाचे स्थान पटकाविले. कार्यास सदैव तत्पर असणारा अनुभवी कार्यकर्त्यांचा संच, हितचिंतक, देणगीदार व सेवाभावी कार्यकर्ते ही प्रबोधनची खरी शक्तिस्थानेच. त्याच्या बळावर गोरेगावात, नवोदित खेळाडूंसाठी सर्व सोयीनीयुक्त असे क्रीडासंकुल उभारण्याचे स्वप्न, प्रबोधनने क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यास सुरुवात केल्यापासूनच, उराशी बाळगले व त्या स्वप्नपूर्तीसाठी संस्थेचे कार्यकर्ते सतत प्रयत्नशील राहिले. त्या प्रयत्नास यश येऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेने 'प्रबोधन क्रीडासंकुल' उभारणीस मान्यता तर दिलीच व त्या क्रीडासंकुलाच्या उभारणीस सक्रीय सहाय्य देण्याचेही मान्य केले. या क्रीडासंकुलाच्या मदतीकरिता 'कल्याणजी–आनंदजी नाईट' या लोकप्रिय वाद्यवृंदाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास माननीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे उपस्थित होते. त्याप्रसंगी आपल्या मार्गदर्शनपर भाषणांत त्यांनी, ''प्रबोधन गोरेगाव, या संस्थेने आपल्या संकल्पित क्रीडाभवनाच्या प्रशिक्षण कार्यक्रमातून ऑलिंपिक दर्जाचे खेळाडू निर्माण करावेत, तसेच जीवनातील यशापयश खिलाडूवृत्तीने स्वीकारण्याच्या वृत्तीचा समाजात प्रसार करावा,'' अशी अपेक्षा व्यक्त केली. त्याचप्रमाणे आपल्या भाषणात प्रदूषित मुंबईविषयी चिंता व्यक्त करुन प्रबोधन संकल्पित क्रीडाभवनात जॉगिंग ट्रॅकची आवश्यकता असल्याचे सांगितले. ''क्रीडाक्षेत्रातील आपले कार्य प्रबोधनने अखंड चालू ठेवावे. आपल्या संकल्पित क्रीडाभवनाच्या उद्घाटनास मी अवश्य येईन,'' असे जाहिर आश्वासन त्यांनी दिले.

या कार्यक्रमाच्या प्रास्तविकात संस्थेचे उपाध्यक्ष श्री. विजय नाडकर्णी यांनी क्रीडाभवनाच्या योजनेविषयी

थोडक्यात माहिती दिली. त्याचप्रमाणे गोरेगावने आता सांस्कृतिक नगरीचा किताब पार्ल्याकडून हिसकावून घेतला आहे, असेही त्यांनी आपल्या भाषणात गौरवाने सांगितले. या कार्यक्रमाच्या तिकिटविक्रीद्वारे एक लाख रुपयांहुनही अधिक रक्कम जमा करणारे संस्थेचे कार्यकर्ते व एक संस्थापक श्री. वसंत तावडे यांचा सर्व कार्यकर्त्यांचे प्रतिक म्हणून शिवसेनाप्रमुखांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## क्रीडासंकुलाचा पायाभरणी समारंभ :

'प्रबोधन क्रीडासंकुला'चा पायाभरणी समारंभ रविवार दि. २२ ऑक्टोबर १९८९ रोजी मुंबईचे तत्कालिन महापौर श्री. शरद आचार्य यांच्या शुभहस्ते सिद्धार्थनगर महानगरपालिका क्रीडांगण, गोरेगाव (पश्चिम) येथे पार पडला. त्याप्रसंगी बोलतांना, ''प्रबोधन गोरेगाव या संस्थेने क्रीडांगणावर राजकारण नाही हेच सिद्ध करुन दाखविले आहे,'' अशा शब्दांत संस्थेचा व संस्थेच्या कार्यकर्त्यांचा गौरव केला. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक श्री. सुभाष देसाई, संस्थेचे अध्यक्ष आमदार श्री. भाई सावंत, नगरसेवक श्री. सुहास सामंत, नगरसेवक श्री. दिलिप लिलाणी, नगरसेवक श्री. दिगंबर कांडरकर व इतर अनेक मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक उपस्थित होते. आपल्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने एक दमदार पाऊल पडलेले पाहुन प्रबोधनच्या कार्यकर्त्यांच्या व हितचिंतकाच्या मनांत तपसाफल्याची भावना होती. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अल्पावधीतच पूर्ण होईल, अशी आमची अपेक्षा आहे.

## प्रबोधन आंतरशालेय क्रीडामहोत्सव–वर्ष १२ वे :

वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी या क्रीडामहोत्सवाचे सातत्याने बाराव्यावर्षी आयोजन करुन संस्थेने क्रीडाक्षेत्रातील आपल्या दैदिप्यमान कामगिरीत एक मानाचा तुरा खोवला. यंदाच्या वर्षीचा हा क्रीडामहोत्सव दि. २२ ते २४ डिसेंबर १९८९ या कालावधीत सिद्धार्थ नगर महापालिका पटांगणावर पार पडला. या क्रीडामहोत्सवाचे उद्‌घाटन ठाण्याचे माजी महापौर श्री. सतीश प्रधान यांनी दि. २२ डिसेंबर रोजी केले. त्याप्रसंगी पाहुण्यांना स्पर्धक खेळाडूंनी शानदार मानवंदना दिली. सतत तीन दिवस चाललेल्या या क्रीडामहोत्सवात खेळाडूंनी आपल्या अंगचे क्रीडानैपुण्य प्रकट करतांना अनेक नवीन विक्रमांची नोंद केली. सालाबादप्रमाणे यंदाच्या क्रीडामहोत्सवासही क्रीडामहर्षी श्री. यशवंतराव गोळे यांचे मार्गदर्शन लाभले. या क्रीडामहोत्सवाचा सांगता समारंभ त्यांच्याच हस्ते दि. २४ डिसेंबर १९८९ रोजी पार पडला. या क्रीडामहोत्सवात वांद्रे ते दहिसर या उपनगरातील ७४ शाळांतील ४५०० हून अधिक मुलामुलींनी भाग घेतला होता. त्यामुळेच या क्रीडामहोत्सवास खरेखुरे महोत्सवी स्वरुप प्राप्त झाले होते.

## स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

**सर्वोत्कृष्ट संघासाठी असलेला 'प्रबोधन फिरता करंडक'**
(यंदाच्या वर्षी संयुक्त विजेते घोषित करण्यात आले)
१. नंदादीप विद्यालय, गोरेगाव
२. मेरी इम्यॅक्युलेट् गर्ल्स् हायस्कूल, बोरिवली

**कबड्डी (मुले) :**
विजेता संघ : चोगले हायस्कूल, बोरिवली
उपविजेता संघ : महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे

**कबड्डी (मुली) :**
विजेता संघ : उत्कर्ष मंदिर, मालाड
उपविजेता संघ : मरोळ प्रागतिक हायस्कूल, अंधेरी

**खो–खो (मुले) :**
विजेता संघ : नंदादीप विद्यालय, गोरेगाव
उपविजेता संघ : अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव

**खो–खो (मुली) :**
विजेता संघ : पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले
उपविजेता संघ : नंदादीप विद्यालय, गोरेगाव

**ॲथ्लेटिक्स्–स्पर्धा :**
विजेता संघ : सेन्ट् थॉमस् हायस्कूल, गोरेगाव
उपविजेता संघ : मेरी इम्यॅक्युलेट् गर्ल्स् हायस्कूल,

बोरिवली

**संचलन स्पर्धा :**

विजेता संघ : मेरी इम्मॅक्युलेट् गर्ल्स् हायस्कूल, बोरिवली

उपविजेता संघ : कॅनोसा हायस्कूल, अंधेरी

**लोकनृत्य स्पर्धा :**

विजेता संघ : चिल्ड्रेन्स् वेल्फेअर सेन्टर, वर्सोवा

उपविजेता संघ : वर्सोवा वेल्फेअर सेन्टर, वर्सोवा

## शालांत परीक्षा व्याख्यानमाला (वर्ष १८वे)

इयत्ता दहावीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त ठरलेली अशी ही मार्गदर्शनपर व्याख्यानमाला प्रत्येक विषयातील तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली फेब्रुवारी १९९० च्या दरम्यान पाटकर महाविद्यालय, स्वा.वि. मार्ग, गोरेगाव (प.) याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडलेल्या या व्याख्यानमालेचा लाभ गोरेगाव व आसपासच्या परिसरांतील हजारो विद्यार्थ्यांनी घेतला. ही व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी श्री. बा.ल. नागवेकर व श्री. सुधीर मिठबावकर यांचे अमोल सहकार्य संस्थेस लाभले.

## वर्धापनदिन सोहळा :

यंदाच्या वर्षीचा वर्धापनदिन सोहळा गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी दि. २६ मार्च १९९० रोजी पाटकर महाविद्यालयाच्या पटांगणात साजरा झाला. दरवर्षी साजरा होणारा वर्धापनदिन सोहळा म्हणजे एक घरगुती समारंभच पण यंदाच्या वर्षीच्या वर्धापनदिन सोहळ्याचे वैशिष्ठ म्हणजे संस्थेचे संस्थापक श्री. सुभाष देसाई व दुसरे आजीव सभासद श्री. गजानन कीर्तीकर या आमदारद्वयांचा हृद्य सत्कार, हे होय.

'प्रबोधन–गोरेगाव' या संस्थेचे संस्थापक श्री. सुभाष देसाई हे तर संस्थेचे एक लेणेच. गेले ४० वर्षे गोरेगावकरांच्या सुखदु:खाशी समरस झालेल्या व गोरेगावकरांच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या श्री. सुभाष देसाई यांनी आपल्या कल्पकतेने अनेक प्रकल्प उभे केले व ते राबविले व त्यातूनच आपल्या प्रत्येक कार्यात आपल्या कल्पकतेचा ठसा उमटविला. माननीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेच्या सर्वोच्च पातळीवरील नेत्यांमध्ये त्यांची सन्माननीय नियुक्ती केली. त्याचप्रमाणे ते 'सामना' या दैनिकाचे विश्वस्त, मुद्रक व प्रकाशक आहेत. आपल्या लोकाभिमुख कार्यामुळे समस्त गोरेगावकरांस परिचित असलेल्या श्री. सुभाष देसाई यांना येथील जनतेने आमदार म्हणून निवडून दिले.

श्री. गजानन कीर्तीकर हे सुद्धा तमाम मराठी बांधवांना परिचित असणारे दुसरे व्यक्तिमत्त. ते सुद्धा संस्थेचे आजीव व क्रीयाशील सभासद आहेत. गोरेगावचे निवासी असलेले श्री. गजानन कीर्तीकर हे 'स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ' या मराठी माणसांना मुंबईत आपले न्याय्यहक्क मिळवून देण्यासाठी झगडणाऱ्या महासघांचे गेली अठरा वर्षे सरचिटणीस म्हणून काम पाहातात. आपल्या कार्याने त्याचप्रमाणे शांत, सुस्वभावी व मनमिळावू स्वभावाने सर्वांना परिचित असणाऱ्या श्री. गजानन कीर्तीकर यांना मालाड विभागाचे महाराष्ट्र विधानसभेत आपले प्रतिनिधित्व करण्यासाठी तेथील जनतेने निवडून दिले.

अशा या आमदारद्वयींचा सत्कार हे यंदाच्या वर्धापनदिनाचे वैशिष्ठ होते. 'प्रबोधन गोरेगाव'चे अध्यक्ष श्री. भाई सावंत यांच्या शुभहस्ते या आमदारद्वयींचा सत्कार करण्यात आला. या मंगलप्रसंगी कला सरगम व संवाद सहयोग द्वारा संचालित जनकवि पी. सावळाराम यांच्या अजरामर मराठी गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. अवीट गोडीच्या या मराठी गीतांच्या कार्यक्रमाने श्रोतृवृंदास जागच्याजागीच खिळवून ठेवले. या कलासंचांतील सर्वच कलाकारांनी मनापासून कार्यक्रम सादर केल्याने रसिकांना मराठी गीतांची अवीट गोडी चाखता आली.

## प्रबोधन बालवाचनालय :

संस्थेच्या रचनात्मक कार्याचा एक भाग म्हणून संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या बालवाचनालयात उत्तमोत्तम व मुलांच्या संस्कारक्षम वयात संस्कार करणाऱ्या ३००० हून अधिक पुस्तकांचा समावेश आहे.

दूरदर्शनसारख्या प्रभावी माध्यमामुळे मुलांची वाचनाची आवड घटत चालली आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतसुद्धां बालवाचनालय सुरु ठेवून संस्थेने आपले कार्य नेटाने पुढे चालविले आहे. या कार्यास पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त प्रतिसाद द्यावा, अशी माफक अपेक्षा संस्था बाळगून आहे.

## प्रबोधन बालवाडी :

संस्थेच्या रचनात्मक कार्याचा भाग असलेल्या व समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असणाऱ्या घटकांना उपयुक्त ठरलेल्या अशा या बालवाड्या संस्थेतर्फे चालविण्यात येतात. या बालवाड्यात बालकांना पूर्व प्राथमिक स्वरुपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते.

## धन्यवाद :

संस्थेच्या प्रत्येक कार्यांत हितचिंतकांचा, सभासदांचा व संस्थेचे खरेखुरे बलस्थान असलेल्या सेवाभावी कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. संस्थेच्या प्रत्येक कार्यांत तत्परतेने मदत करणाऱ्या अनेक मान्यवर व्यक्तिंच्या व संस्थांच्या पाठिंब्यामुळे, सक्रिय सहाय्य व सहकार्यामुळेच संस्थेस सामाजिक, शैक्षणिक व क्रीडाक्षेत्रात भरीव कामगिरी करता आली व येथवर मजल मारता आली. संस्थेच्या क्रीडासंकुल उभारणीस ज्या सन्माननीय नगरसेवकांनी व महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी भरीव मदत केली, त्या सर्वांची संस्था सदैव ऋणी राहिल. त्याचप्रमाणे पत्रकारमित्र व इतर सेवाभावी संस्था ह्यांनीही बहुमोल असे सक्रीय सहकार्य दिले. संस्थेचे सरकारमान्य हिशोब तपासनीय श्री. नायक आणि कं. यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शन व सहकार्याबद्दल संस्था त्यांची अत्यंत ऋणी आहे. संस्थेच्या यापुढील वाटचालीतही सर्वांचा लोभ व प्रेम तसेच कायम राहिल असा विश्वास व्यक्त करीत आहोत.

आपले नम्र,

कार्यकारी मंडळ (१९८९–९०)

**प्रबोधन गोरेगाव**

## प्रबोधन गुणवत्ता पारितोषिके १९८९
## पारितोषिक वितरण समारंभ ५–४–८९
## दिनानाथ नाट्यगृह

| | | नाव | शाळा |
|---|---|---|---|
| १ | गोरेगावातील सर्व मराठी माध्यमाच्या शाळातून सर्व प्रथम :<br>कै. वासुदेव कृष्णाजी सैतवडेकर स्मृति पारितोषिक<br>रोख रू. १००/– श्री. सुरेश सैतवडेकर यांजकडून | कु. दर्शना शहा<br>६४९ / ७००<br>९२.७१%<br>गुणवत्ता यादीत ९ वा क्रमांक | सन्मित्र विद्यामंदिर |
| २ | मराठी विषयात सर्वाधिक गुण<br>श्री. वसंत तावडे, प्रबोधन गोरेगाव यांजकडून रोख रू. ५०/– | कु. नंदन बाणे<br>८४ / १०० | नंदादीप विद्यालय |
| ३ | इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण<br>श्री. सुभाष देसाई, प्रबोधन गोरेगाव यांजकडून रोख रु. ५०/– | कु. नंदन बाणे ९१/१००<br>कु. नेत्रा सोमेश्वर ९१/१००<br>कु. संगिता राजपूत ९१/ १०० | नंदादीप विद्यालय<br>सन्मित्र विद्यामंदिर<br>अ.भि. गोरेगावकर इं. स्कूल |
| ४ | हिंदी विषयात सर्वाधिक गुण<br>कै. मालतीबाई गुप्ते स्मृति पारितोषिक<br>श्री. जयंतराव गुप्ते यांजकडून रोख रु. ५०/– | कु. सुरेखा मोरे ७५ / १०० | नंदादीप विद्यालय |
| ५ | गणित विषयात सर्वाधिक गुण<br>श्री महादेव खानोलकर प्रबोधन गोरेगाव यांजकडून<br>रोख रू. ५०/ –<br>तसेच कै. गोपिकाबाई कृष्णाजी अदवानकर<br>स्मृती पारितोषिक. श्री. मनोहर अदवानकर<br>प्रबोधन गोरेगाव यांजकडून – रोख रू. ५०/– | कु. कालिंदी गोखले १४८/१५०<br>कु. अश्लेषा गोसावी १४८/१५०<br>कु. पल्लवी भावे १४८/१५० | सन्मित्र विद्यामंदिर<br>अ.भि. गोरेगावकर इं. स्कूल<br>अ.भि. गोरेगावकर इं. स्कूल |
| ६ | समाजशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण<br>श्री. कृष्णकांत मार्तंड जोशी<br>व श्रीमती गीता सामंत यांजकडून रोख रू.५०/– | कु. स्वाती शेटे ९८/१०० | अ.भि. गोरेगावकर इं. स्कूल |
| ७ | हिंदी संस्कृत या विषयात सर्वाधिक गुण<br>श्री. आर. एस. जंगम यांजकडून रोख रू.५०/– | कु. वैशाली सामंत ८२/ १०० | कुलदिपसिंग दिवान हायस्कूल |
| ८ | शास्त्र विषयात सर्वाधिक गुण<br>श्री. पद्माकर देसाई यांजकडून रोख रु. ५०/–<br>व कै मंदार नरसिंह पाटील यांच्या स्मरणार्थ<br>श्री. नरसिंह बाळकृष्ण पाटील यांजकडून रोख रु. ५०/– | अभय सोमण १४७/१००<br>कु. चारुता रोगे १४७/ १००<br>मंगेश केळकर १४७/ १०० | सन्मित्र विद्यामंदिर<br>सन्मित्र विद्यामंदिर<br>अ.भि. गोरेगावकर इं. स्कूल |
| ९ | संस्कृत विषयात सर्वाधिक गुण<br>कै. कृष्णाजी वासुदेव अदवानकर स्मृति पारितोषिक<br>श्री. मनोहर अदवानकर यांजकडून रोख रू.५०/– | अनंत चित्रे ९८/१००<br>कु. वर्षा कुलकर्णी ९८/१००<br>आशुतोष मदभावी ९८/१००<br>कु. दिपा सावंत ९८/१००<br>कु. दर्शना शहा ९८/१०० | अ.भि. गोरेगावकर इं. स्कूल<br>अ.भि. गोरेगावकर इं. स्कूल<br>अ.भि. गोरेगावकर इं. स्कूल<br>अ.भि. गोरेगावकर इं. स्कूल<br>सन्मित्र विद्यामंदिर |

# प्रबोधन गोरेगाव

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. Bom. 46/72 GB BSD]
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. F 2502 Bom]

१९८९–१९९०


अध्यक्ष : श्री. निळकंठ ज. सावंत
उपाध्यक्ष : श्री. प्रभाकर मोडक डी. एम्.आी. डी. इ.ओ.
श्री. विजय नाडकर्णी बी.ई. (ऑ.) सिव्हील

## कार्यकारी मंडळ

कार्याध्यक्ष : श्री. गिरीश देसाई डी.सी.ई.
प्रमुख कार्यवाह : डॉ. मनोहर अदवानकर एम्.एस्सी. पी. एच्. डी,
सहकार्यवाह : श्री. सुरेश चव्हाण बी.ए.
: श्री. श्रीनिवास शिरसेकर बी.डी.आर्ट
खजिनदार : श्री. महादेव खानोलकर

## सभासद

श्री. सुभाष देसाई, आमदार
श्री. वसंत तावडे बी.ए.
श्री. दिनकर मालवणकर
श्री. पदमाकर देसाई बी.एस्सी.(ऑ)
श्री. विलास देवरुखकर बी.एस्सी(ऑ)
श्री. सुरेश सैतवडेकर
श्री. दिलीप साळवी बी. एस्सी.(ऑ.)
श्री. विकास रेळे बी. ए. एलएल.बी.
श्री. नितीन शिंदे
श्री. चद्रकांत पोतदार
श्री. चंद्रकांत देऊलकर

सनदी लेखपाल
मे. एस. एस. नायक आणि कं.



कार्यालय :
२, प्रेमबिंदु, स्वा. वि. मार्ग
गोरेगाव (प),
मुंबई–४०० ०६२

संपर्क :
रंगसेवा
फिल्मिस्तान जवळ, स्वा. वि. मार्ग
गोरेगाव [प] मुंबई-४०० ०६२
दूरध्वनी : ६७२ ४१ ५७